अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:-अतिमआ/साप्रवि/आस्था/२४९१
दिनांक : १३/०७ /२०२०.

**आदेश**

**विषय :** कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.
सर्वसाधारण कामकाजात मदतीसाठी स्वयंसेवक नियुक्त करणेबाबत.

**संदर्भ :** १) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२०.

संदर्भ क्र. १ चे अधिनियमांतील भाग ६ - स्थानिक प्रशासन, नियम ४१ (२) नुसार स्थानिक प्रशासनास आपत्ती व्यवस्थापन कार्यास आवश्यक वाटेल अशा उपाययोजना करण्याचे अधिकार आहेत. संदर्भ क्र. २ चे महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० मधील १० (ऐ) नुसार मा.महापालिका आयुक्त यांना त्या भौगोलिक क्षेत्रामधील सर्व शासकीय विभाग/संस्थांच्या आस्थापनेवरील किंवा निर्देशित करतील अशा कोणत्याही व्यक्तींच्या सेवा कोव्हीड १९ या रोगाचे नियंत्रण/प्रतिबंधात्मक/आपत्कालीन उपाययोजना करण्याचे कामासाठी अधिग्रहित करता येतात.

उपरोक्त तरतुदी विचारात घेऊन पुणे महानगरपालिका संकेतस्थळावर कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनेचे सर्वसाधारण कामकाजात मदतीसाठी स्वयंसेवक म्हणून काम करण्यास इच्छुक स्वयंसेवी संस्था स्वयंसेवक व इतर स्वयंसेवक यांनी अर्ज करावेत असे अवाहन केलेले होते.

वरील अवहनास प्रतिसाद देऊन अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघ यांचेकडून कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजनाकरिता मदत करणेसाठी स्वयंसेवक नियुक्त करणेसाठी इच्छुक्ता दर्शविलेल्या खालील स्वयंसेवकांच्या सेवा कोव्हीड १९ या रोगाचे नियंत्रण/प्रतिबंधात्मक/आपत्कालीन उपाययोजना करण्याचे कामकाजासाठी निम्नलिखित अटी व शर्तींचे अधीन अधिग्रहित करण्यात येत आहेत.

खालील स्वयंसेवकांनी त्यांचे नावासमोर नमूद कामाजाचे ठिकाणी हजर होऊन, तेथील नियंत्रक सांगतील ते कामकाज करावे.

| अ.क्र. | स्वयंसेवकांचे नाव | संपर्क क्रमांक | कामाचे स्वरूप व ठिकाण |
|---|---|---|---|
| 1 | Umesh Zirpe | 9890620490 | समन्वयक |
| 2 | Chandan Chavhan | 7767031975 | समन्वयक |
| 3 | Deepak More | 7588032355 | समन्वयक |
| 4 | Sachin Gaikwad | 9823081440 | आपत्ती व्यवस्थापन कक्ष, मुख्य इमारत |
| 5 | Tirthraj Joshi | 9822027394 | समन्वयक |
| 6 | Ajit Tate | 9423576661 | आपत्ती व्यवस्थापन कक्ष, मुख्य इमारत |
| 7 | Shripad Gokhale | 9850295426 | आपत्ती व्यवस्थापन कक्ष, मुख्य इमारत |
| 8 | Kaustubh Thakar | 9822842063 | आपत्ती व्यवस्थापन कक्ष, मुख्य इमारत |